ePaper


## देशात आणि राज्यात विरोधकांची एकजूट कायम राहील!; उद्धव ठाकरे



| वर्ष - 6 | अंक - 351 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**

- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण येत्या जूनपासून होणार लागू
- 'इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह' च्या कामगारांना पगारवाढ
- एसटी कर्मचाऱ्यांच्या पदरी प्रतीक्षाच


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 11 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# चिंचवडमध्ये 'आम्ही सारे सावरकर'!

## » गौरव यात्रेत हजारोंचा सहभाग : सावरकर प्रेमींचा जनसमुदाय उसळला

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी -चिंचवड शहर भाजपच्या वतीने महाराष्ट्राचे वीर सुपुत्र, थोर समाजसुधारक, तेजस्वी विचारवंत, स्वातंत्र्य सेनानी विनायक दामोदर सावरकर यांच्या सन्मानार्थ चिंचवड विधानसभा मतदारसंघात रविवारी (दि. ९) वीर सावरकर गौरव यात्रा ढोलताशे आणि टाळ मृदूंगाच्या गजरात काढण्यात आली. या गौरव यात्रेत चिंचवड विधानसभा मतदारसंघातील हजारो सावरकर प्रेमी "आम्ही सारे सावरकर"च्या घोषणा देत उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.



सावकरांचे वशंज सात्यकी सावरकर, आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप व सावरकरांच्या वेशभूषेतील राजेंद्र परदेशी यांच्या हस्ते रहाटणी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर शिववंदना म्हणून वीर सावरकर गौरव यात्रेची सुरवात झाली.

अत्यंत उत्साहात पार पडलेल्या या गौरव यात्रेत भाजपचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, विश्व हिंदू परीषदेचे पदाधिकारी धनंजय गावडे, नितीन वाटकर, सावरकर सामाजिक संस्थेचे श्रीनिवास कुलकर्णी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शिवसेना शहरप्रमुख निलेश तरस, प्रहार संघटनेचे शहराध्यक्ष संजय गायके, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, स्थायी समिती माजी अध्यक्ष राजेंद्र राजापुरे, माजी उपमहापौर झामाबाई बारणे, प्रदेश सदस्य संतोष कलाटे, चंद्रकांत नखाते, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, भाजयुमोचे शहराध्यक्ष संकेत चौंधे, महिला मोर्चा शहराध्यक्षा उज्वला गावडे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे चिंचवड विधानसभेतील सर्व नगरसेवक, सर्व जिल्हा पदाधिकारी, मंडल पदाधिकारी तसेच मित्र पक्षातील शिवसेना, आरपीआय, रासप, शिवसंग्राम व प्रहार संघटनेतील प्रमुख पदाधिकाऱ्यांसह चिंचवडमधील हजारो सावरकर प्रेमी नागरिक सहभागी झाले होते.

### चित्ररथाचे विशेष आकर्षण...

»या गौरव यात्रेत नादब्रह्म पारंपारिक ढोल ताशा पथक, सांगवीतील डोनेट सोसायटीचे महिला लेझीम पथक तसेच तुळजा भवानी मर्दानी खेळ प्रशिक्षण संस्था सांगवी यांनी सहभाग घेत आपल्या खेळांचे प्रदर्शन केले. त्याचबरोबर ज्ञानाई शिक्षण संस्थेच्या वारकरी विद्यार्थ्यांनी टाळ मृदुंग या वाद्यांच्या गजरात सहभाग घेतला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या गौरवार्थ बनविण्यात आलेला चित्ररथ हे या यात्रेचे विशेष आकर्षण होते. स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रेचे सर्व नियोजन व आयोजन चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी केले. त्यांना सहाय्यक म्हणून जिल्हा सरचिटणीस ॲड. मोरेश्वर शेडगे यांनी काम पाहिले.

# महापालिका सेवक पतसंस्थेवर कुणाचे वर्चस्व?

## » आज होणार मतदान : चार पॅनेल निवडणुकीच्या रिंगणात

।पिंपरी–चिंचवड।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महापालिका सेवकांची सहकारी पतसंस्था पंचवार्षिक निवडणूक उद्या (मंगळवारी) होणार आहे. चार पॅनेल निवडणुकीच्या रिंगणात आहेत. 3 हजार 739 कर्मचारी मतदानाचा हक्क बजाविणार आहेत. त्यामुळे महापालिका सेवक पतसंस्थेवर कुणाचे वर्चस्व राहणार याकडे कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.



महापालिका भवनात मंगळवारी सकाळी 9 ते सायंकाळी 5 या वेळेत मतदान होणार आहे. स्व. शंकरअण्णा गावडे कर्मचारी महासंघ, आपला महासंघ, ओम चैतन्य गगणगिरी पॅनेल आणि शिव-फुले-शाहू-आंबेडकर विचारमंच असे चार पॅनेल आहेत.

पतसंस्थेच्या 19 जागांसाठी 54 उमेदवार रिंगणात आहेत. 14 जागा सर्वसाधारण, 2 जागा महिलांसाठी आणि अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय व भटक्या विमुक्त जाती-जमातींसाठी प्रत्येकी 1 जागा राखीव आहेत. मंगळवारी मतदान झाल्यानंतर मतमोजणीला सुरुवात होणार आहे.

### 3 हजार 739 कर्मचारी मतदानाचा हक्क बजाविणार



» पतसंस्थेच्या 19 जागांसाठी 54 उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीत 3 हजार 739 कर्मचारी मतदानाचा आपला हक्क बजाविणार आहेत. मतदानासाठी कर्मचाऱ्यांना सवलत देण्यात यावी, अशी (PCMC) मागणी महापालिका सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्रशासनाकडे केली होती.त्यानुसार मतदानासाठी कर्मचाऱ्यांना सवलत देण्यात येणार आहे. तसेच कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी, कर्तव्य, अत्यावश्यक सेवेत कोणताही अडथळा, विस्कळीतपणा येणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक असल्याचे परिपत्रकात अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांनी म्हटले आहे.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण येत्या जूनपासून होणार लागू

## पुणे दौऱ्यावर असताना सोमवारी केसरकर यांनी ही माहिती दिली

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**'बहुप्रतिक्षित असणारे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्यात येत्या जूनपासून लागू होणार आहे. या धोरणाची अंमलबजावणी जूनपासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षापासून केली जाईल," असा सूतोवाच शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी केला.**

पुणे दौऱ्यावर असताना सोमवारी केसरकर यांनी ही माहिती दिली. दिवंगत खासदार गिरीश बापट यांच्या कुटुंबीयांची केसरकर यांनी भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबद्दल सांगितले. ते म्हणाले, "अभियांत्रिकी, तांत्रिक शिक्षण हे मराठीतून देण्यात येणार आहे. त्याप्रमाणे लवकरच वैद्यकीय शिक्षणही मराठीतून दिले जाणार आहे. मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या देशांमध्ये सर्वाधिक शास्त्रज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते आहेत. आता भारतातही मातृभाषेतील शिक्षणाला विशेष महत्त्व दिले जाईल."

राज्यात अनेक ठिकाणी झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले, याबाबत केसरकर म्हणाले, "शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत झाली पाहिजे, ही भावना आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येतील. सॅटेलाईटद्वारे पंचनामे करण्याचा विषय कॅबिनेटमध्ये आला आहे. परंतु याविषयाबाबत राजकारण करणे योग्य नाही."

### मुंबईवर हक्क सांगणाऱ्यांनी अडीच वर्षात काय केले

**“आज आम्ही भारतीय जनता पक्षासमवेत युतीत आहोत आणि आमचे चांगले संबंध आहे. मुंबईतील मराठी माणसाला न्याय द्यायचा आहे. शुद्ध हवा हा येथील प्राधान्यक्रमावरील विषय आहे. मुंबईवर हक्क सांगतात, त्यांनी अडीच वर्षात पर्यावरणावर काहीच काम केले नाही. त्यांनी केलेल्या चुका आम्ही सुधारत आहोत.”**



असे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले. 'मुंबईचा महापौर कोण असेल', या चर्चेबाबत ते म्हणाले,"मैत्रीमध्ये पदाची चर्चा असता कामा नये. तर जनतेला काय द्यायचे हे महत्त्वाचे आहे. मुंबईला आंतरराष्ट्रीय शहर बनविण्याचा आमचा निर्धार आहे."

# दहा हजार एकरवरील द्राक्षबागांना अवकाळीचा फटका

## दर कोसळले, निर्यातीवर परिणाम

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

राज्यातील सुमारे दहा हजार एकरावरील द्राक्षबागा अवकाळीच्या तडाख्यात सापडल्या आहेत. हंगाम अखेरच्या टप्प्यात असून, दर आणि मागणीअभावी द्राक्षे काढणीच्या प्रतीक्षेत आहेत. द्राक्षांबरोबर बेदाणा-निर्मितीलाही फटका बसला आहे.

राज्यात सांगली, सातारा, सोलापूर, पुणे, नाशिक, उस्मानाबाद जिल्ह्यांत द्राक्षांखालील क्षेत्र साडेतीन लाख एकरच्या घरात आहे. आजघडीला राज्यभरातील सुमारे दहा हजार एकरावरील द्राक्षबागांमध्ये द्राक्षे आहेत. काढणीला आलेल्या या द्राक्षबागा अखेरच्या टप्प्यात अवकाळीच्या तडाख्यात सापडल्या आहेत.



सोलापूर परिसरात सर्वाधिक सहा हजार एकर, तर पुणे, सांगली, उस्मानाबाद आणि नाशिक जिल्ह्यात प्रत्येकी हजार एकरवरील द्राक्षबागांमध्ये अद्यापही द्राक्षे आहेत. निर्यातक्षम द्राक्षांना प्रतिकिलो ५० ते ६० रुपयांपर्यंत दर मिळत होता. नाशिक, नारायणगाव, बोरी, तासगाव, सोलापूर परिसरातून चांगली निर्यात सुरू झाली होती.

### बेदाणा काळवंडला

**सांगलीच्या पूर्व भागात बेदाणा उद्योगाचा चांगला विकास झाला आहे. यंदा सुमारे दोन लाख टन बेदाणानिर्मितीची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, बेदाणानिर्मिती वेगाने सुरू असतानाच अवकाळी पाऊस कोसळला. तासगाव पूर्व भागात सलग चार दिवसांपासून पाऊस पडत आहे. त्यामुळे बेदाणा काळा पडत आहे. अपेक्षित रंग येत नसल्यामुळे अधिक खर्च करून गंधकाची धुरी द्यावी लागत आहे. साखर भरलेल्या द्राक्षांवर पाऊस झाल्यामुळे गोडी कमी होत आहे. उतारा कमी पडत असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.**

# शेतकरी आवडतोय, की शेतकऱ्याची जमीन?

## विनोद तावडे यांची शरद पवार यांच्यावर टीका

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



मला शेतकरी जवळचा वाटतो, असे शरद पवार म्हणतात. पण शेतकरी आवडतोय की शेतकऱ्याची जमीन आवडतेय हा लोकांच्या मनात प्रश्न आहे, अशा शब्दांत भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली.

स्वातंत्र्यवीर सावरकरप्रेमींतर्फे सोमवारी सायंकाळी पुण्यात सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली. कर्वे रस्त्यावरील सावरकर स्मारक ते फर्ग्युसन महाविद्यालयातील वसतिगृह या मार्गावर सावरकर गौरव यात्रा काढण्यात आली. या यात्रेत राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे सहभागी झाले होते. या वेळी माध्यमांशी बोलताना तावडे यांनी पवार यांच्यावर टीका केली.

तावडे म्हणाले, की मी शेतकऱ्यांसोबत आहे, मला शेतकरी जवळचा वाटतो, असे काल शरद पवार म्हणाले.

# शनिवारवाडा परिसरातील जुन्या वाड्यांसाठी पुरातत्व विभागाकडे पाठपुरावा

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची ग्वाही

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुण्यातील शनिवारवाडा परिसरातील जुन्या वाड्यांचे पुनर्निर्माण करण्यास अनेक अडथळे आहेत. त्यामुळे येथील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने, स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने पुरातत्व विभागाकडे पाठपुरावा करून मार्ग काढू, अशी ग्वाही पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी दिली.**



ऐतिहासिक वारसा असलेल्या वास्तूंच्या १०० मीटर परिसरातील बांधकामांना आणि दुरुस्तीला पुरातत्व विभागाकडून बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरातील अनेक बांधकामे धोकादायक परिस्थितीत आहेत. हा प्रश्न सोडविण्यासाठी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्थानिकांची भेट घेऊन जुन्या वाड्यांची पाहणी केली.

.या पाहणीनंतर पाटील म्हणाले की, पुरातत्व विभागाच्या परिपत्रकामुळे पुण्याचा मध्यभाग असलेल्या शनिवारवाड्याच्या शंभर मीटर परिसरात नव्याने बांधकाम किंवा दुरुस्ती करता येत नाही. शहरातील अन्य ठिकाणीदेखील अशी समस्या येत आहे. याबाबत राज्य शासनाची भूमिका सकारात्मक आहे. मात्र, याबाबतचे पुरातत्व विभागाशी संबंधित प्रकरण सर्वोच्च न्यायालयाकडे प्रलंबित असल्याने त्याबाबतची माहिती घेऊन बांधकामांना स्थगिती नसल्यास पुरातत्व विभागाकडे याबाबत पाठपुरावा करण्यात येईल. त्यासाठी स्थानिकांना सोबत घेऊन दिल्लीत पुरातत्व विभागाच्या

# 'इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह' च्या कामगारांना पगारवाढ!

## » आमदार महेश लांडगे यांची यशस्वी मध्यस्थी : नाशिक औद्योगिक क्षेत्रातील सर्वाधिक वेतनवाढ

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी : नाशिक औद्योगिक वसाहातीमधील सातपूर येथील इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट इंडिया प्रा. लि. च्या कामगारांना तब्बल १६ हजार रुपयांची वेतनवाढ मिळाली आहे. आमदार महेश लांडगे यांनी कंपनी व्यवस्थापन आणि कामगार संघटना यांच्यात यशस्वी मध्यस्थी केली. विशेष म्हणजे, नाशिक, सातपूर औद्योगिक क्षेत्रातील ही सर्वाधिक वेतनवाढ ठरली आहे.**



इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह कॉम्पोनंट इंडिया प्रा. लि. आणि स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना यांच्यामध्ये हॉटेल कलासागर, कासारवाडी, नाशिकफाटा येथे झालेल्या पहिला वेतनवाढ करार झाला. यावेळी आमदार महेश लांडगे, संघटनेचे प्रमुख सल्लागार, रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवन येळवंडे व कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर सुनील कोपरकर यांनी करारावर स्वाक्षरी केली आहे.

यावेळी सरचिटणीस कृष्णा रोहोकले, चिटणीस रघुनाथ मोरे, उपाध्यक्ष शामभाऊ सुळके, खजिनदार अमृत चौधरी, माथाडी कामगार नेते किसनराव बावकर, प्रशांतआप्पा पाडेकर, महादेव येळवंडे, रविंद्र भालेराव, दत्तात्रय गवारे, दत्ता येळवंडे, कुणाल कोळेकर, युनिट प्रतिनिधी विष्णू रासकर, बाबुराव पोते, हेमंत हिरे, दत्तात्रय कांदळकर, शुभम एरंडे, कमलेश पाटील, प्रमोद लोहार, जगन लांडगे, एच. आर. डायरेक्ट इंडिया हेड दिपाली खैरनार, प्लॅन्ट हेड. दिप्तीरंजन नायक, डी. जी.एम, एच आर अनिकेत निळेकर, रिजनल मॅनेजर आय. आर अनिल कुंभार, एच. आर. असि. मॅनेजर श्रीकांत पाटील आदी उपस्थित होते.



वेतनवाढ करारानुसार, कामगारांना एकूण १६ हजार रुपयांची पगारवाढ मिळाली आहे. पगाराचा रेशो पहिल्या वर्षी ७० टक्के, दुसऱ्या वर्षी १५ टक्के आणि तिसऱ्या वर्षी १५ टक्के असा मिळणार आहे. कामगारांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस ३ लाख रुपये या प्रमाणे चार व्यक्तींसाठी १२ लाख रुपयांची मेडिक्लेम पॉलिसी राहणार संपूर्ण खर्च कंपनी करणार या पॉलिसी मध्ये स्वतः, पत्नी, आणि मुले यांचा समावेश करण्यात येणार आहे. यासह मृत्यू साहाय्य योजना, ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी, टर्म इन्शुरन्स पॉलीसी, दिवाळी बोनस, मासिक हजेरी बक्षीस, वार्षिक स्नेहसंमेलन, प्रत्येक कामगाराला प्रत्येकी ५ महिन्याचा फरक एप्रिल महिन्याच्या पगारामध्ये देण्यात येणार आहेत.

### 40 कंत्राटी कामगार कायम सेवेत...

**» वेतनवाढ करारानुसार कंपनीतील कंत्राटी कामगारांना कंपनी रोलवर घेऊन कायम नोकरी देण्याचे ठरले आहे. तसेच, उर्वरीत कामगारांना पुढील करारामध्ये कायम करण्याचे अस्वासन व्यवस्थापनाने दिले आहे. या करारानुसार कामगारांना चांगल्या सोयी-सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे कामगारानी डिजेच्या तालावर नाचून, पेढे वाटून फटाक्याची अतिषबाजी करुण आनंद व्यक्त केला.**

# भोसरीत बुधवारी वीर सावरकर गौरव यात्रा

## » विजय फुगे यांची माहिती : प्रसिद्ध व्याख्याते नितीन आपटे यांचे व्याख्यान

।पिंपरी-चिंचवड।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जाज्वल्य कार्याचे स्मरण आणि गौरव करण्यासाठी भोसरी विधानसभा मतदार संघात सावरकर गौरव यात्रेचे आयोजन केले आहे, अशी माहिती भाजपा चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी आणि सरचिटणीस विजय फुगे यांनी दिली.**


भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी, दि. १२ एप्रिल रोजी ही यात्रा होणार आहे. सायंकाळी ५ वाजता भोसरी चौकातून यात्रेला प्रारंभ होईल. भोसरी चौक- दिघी रोड- आळंदी रोड- मार्गे कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह येथे समारोप होईल. त्यानंतर प्रसिद्घ व्याख्याते नितीन आपटे यांचे व्याख्यान होणार आहे.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबाबत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी अवमानकारक वक्तव्य केले होते. यासाठी भाजपातर्फे राज्यभरात सावरकर गौरव यात्रांचे आयोजन केले आहे.

प्रत्येक विधानसभा मतदार संघनिहाय यात्रा काढण्यात येत आहे. भोसरी विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी, माजी नगरसेवक यांच्यासह भाजपा परिवारातील सर्व संस्था, संघटनांचे प्रतिनिधी आणि सर्व सावरकरप्रेमी नागरिक या गौरव यात्रेत सहभागी होणार आहेत.

> जाज्वल्य देशभक्त, स्वदेशीचा पुरस्कर्ता, प्रखर क्रांतिकारक, विज्ञाननिष्ठ, तर्कसिद्ध हिंदुत्वाचा भाष्यकार, थोर संघटक, आग्रही आणि सक्रीय समाजसुधारक, द्रष्टा राजकारणी, ओजस्वी वक्ता आणि प्रतिभाशाली साहित्यिक, अशा अनेकविध गुणांच्या माध्यमातून आपले संपूर्ण जीवन केवळ देश, मातृभूमी आणि स्वातंत्र्यासाठी झोकून देणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचले पाहिजेत, हाच या गौरव यात्रेचा हेतू आहे.
> - महेश लांडगे,
> शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.





## संपादकीय »

# वावदूकांचे विषाणू वारे!

***करोनाचे रुग्ण वाढू लागल्याची चर्चा गेले काही दिवस वाचनात-ऐकण्यात येत होती. या तर्क-वितर्कावर बुधवारी शिक्कामोर्तब झाले. देशभरात या दिवसभरात ३,०१६ नव्या रुग्णांची नोंद झाली.***

'गेल्या जवळपास सहा महिन्यांतली' ही सर्वाधिक रुग्णवाढ ठरली. गतवर्षी २ ऑक्टोबर रोजी तीन हजारांहून अधिक नव्या रुग्णांची नोंद झाली होती. त्यानंतर प्रथमच इतकी वाढ दिसून आली. करोनाच्या प्रादुर्भावानंतर विषाणूच्या तीन लाटा किंवा आवर्तने आपण पाहिली. त्यांची तीव्रता आणि व्याप्ती पाहता, तितकी आणीबाणी अद्याप अवतरलेली नाही हे खरेच. परंतु उपचारापेक्षा सावधगिरी केव्हाही हितकारक हा वैद्यकशास्त्रातला पहिला नियम. पहिल्या उद्भवापेक्षा 'डेल्टा प्लस' या करोना उत्परिवर्तनाच्या दुसऱ्या लाटेतला हाहाकार आपण अनुभवलेला आहे. त्या वेळी म्हणजे २०२१ मध्ये साधारण याच दरम्यान त्या उत्परिवर्तनाच्या असाध्यतेपेक्षा अधिक मारक ठरला, आपल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील सिद्धतेचा अभाव. करोनाला कसे टाळावे याविषयी संशोधन सुरूच होते व आहे; परंतु करोना सर्वाधिक त्वेषाने फुप्फुसांवर आघात करतो हे त्या वेळेपर्यंत पुरेसे सिद्ध झाले होते. तरीही प्राणवायूचा पुरेसा आणि वक्तशीर पुरवठा करण्यात केंद्र सरकार तसेच बहुतेक राज्य सरकारे कमी पडली आणि त्याची भयंकर किंमत सर्वसामान्य नागरिकांना मोजावी लागली. यात प्रामुख्याने असा वर्ग होता, ज्यात कमावणारी मंडळी निवर्तल्यानंतर उर्वरितांचे अधिकच हाल झाले. पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या आवर्तनाचे गुणधर्म निराळे होते. २४ मार्च २०२० रोजी पहिल्यांदा देशव्यापी टाळेबंदी, संचारबंदी जाहीर झाली त्या वेळी उपजीविकेपेक्षा जीविताला प्राधान्य देण्याचे धोरण होते. गतवर्षी ओमायक्रॉन या करोनाच्या आणखी उत्परिवर्तनाची संसर्गक्षमता आधीच्यांपेक्षा खूपच अधिक होती. सुदैवाने मनुष्यहानी तुलनेने कमी झाली. करोनाने आजवर देशभरात पाच कोटींहून अधिक बाधित झाले, तर चार लाखांहून अधिकांना प्राण गमवावे लागले. करोना प्रतिबंधक लशींच्या २२० कोटींहून अधिक मात्रा आतापर्यंत दिल्या गेल्या आहेत. परंतु करोनाच्या बाबतीत विचित्र बाब म्हणजे, असा काही संख्यात्मक लेखाजोखा मांडला जाऊ लागतो तोवर नवी लाट येऊन धडकते. यंदाही बहुधा तसेच काहीसे घडत असावे.

# आता निसर्गाचेही टार्गेट केवळ शेतकरी




शेती,शेतकरी आणि त्याच्या पदरात पडणाऱ्या उत्पन्नाचा विचार केल्यास गेल्या दोन दशकात निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्याला जश्या सगळ्या यंत्रणा ठेवून लुबाडतात तसाच प्रयत्न सतत चार पाच वर्षांपासून निसर्ग करीत असल्याचे लक्षात आले आहे. जणू काही निसर्ग शेतकऱ्याला ठरवून टार्गेट करीत असल्यासारखा वागत आहे. हातातोंडाशी आलेला घास पळविण्याचे भयंकर षडयंत्र शेतकऱ्याच्या बाबतीत होताना दिसत आहे. सरकारने तर त्याला कधीच वाऱ्यावर सोडले आहे अशावेळी ज्या निसर्गावर त्याची भिस्त होती तो सुद्धा बेईमान झाल्यामुळे शेतकऱ्याचा कुणी वाली राहिला आहे असे म्हणायचे धाडस होत नाही. उन्हाळ्यात अवकाळी पावसाने उन्हाळी पिके आणि फळबागा नेस्तनाबूत झाल्या आहेत. राजकीय पक्ष सत्तेच्या खेळात



मश्गुल असल्याने एकेका शेतकऱ्याची मोडलेली कंबर बघायला कुणालाही वेळ नाही. सगळेच किसानपुत्र आहेत पण किसानी कुणाच्या रक्तात शिल्लक नाही.

निसर्गाचा समतोल बिघडल्याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसत आहे. ऐन उन्हाळ्यात पिकांची काढणी सुरू असताना वादळी वाऱ्यांसह गारपीट झाली. त्यामुळे काढणीला आलेल्या आणि काढणी झालेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले. नगर जिल्ह्यात अनेक ठिकाणी शनिवारी सायंकाळी आणि रात्री गारपीट झाली. शेतात आणि रस्त्यांवरही गारांचा खच पडला होता. हवामान विभागाने गारांसह पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविला होताच, तो खरा ठरला. आधीच करोनामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना या दुसऱ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. वऱ्हाडातील अकोला,बुलडाणा,वाशीम,यवतमाळ ,अमरावती या भागात आज दिवसभर तुफान पाऊस झाला. अनेक ठिकाणी गाराही पडल्या. यामुळे डाळिंब, गहू, हरभरा, भाजीपाल्यासह आंब्याचे मोठे नुकसान झाले. पावसामुळे शेतीचही मोठे नुकसान झाले, तर काही ठिकाणी घरांचीही पडझड झाली आहे.

अनेक ठिकाणी सुमारे अर्धातास गारांचा पाऊस सुरू होता. हरभऱ्याच्या आकाराएवढ्या गारा बरसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.सध्या अनेक ठिकाणी गव्हाची काढणी सुरू आहे. शेतात काढून ठेवलेल्या पिकाचे आणि काढणीला आलेल्या उभ्या पिकाचे यामुळे नुकसान झाले. पावसात भिजलेला गहू आता पांढरा पडण्याची शक्यता असल्याने त्याला भाव कमी मिळणार आहे. फळबागांचे नुकसान झाले आहे. आंब्याला आलेला मोहर वादळ आणि गारांमुळे गळून पडला आहे. डाळींब, द्राक्ष या पिकांचेही नुकसान झाले. गेल्या वर्षी अतिवृष्टीनंतर झालेल्या नुकसानीचे पंचनामे झाले होते, त्याची नुकसानभारपाईही अनेक शेतकऱ्यांना अद्याप मिळाली नाही. त्यातच आता पुन्हा नव्याने नुकसान झाले आहे. सतत होणार पाऊस ही नैसर्गिक आपत्ती जरी शासनाने जाहीर केली असली तरी त्याचा योग्य मोबदला देण्याची व्यवस्था जोवर खालच्या पातळीवर तयार होत नाही तोवर शेतकऱ्यांना दिलासा मिळणार नाही.

कोरोनाच्या काळात देशाच्या अर्थव्यवस्थेला शेतीनेच तारल्याचे आढळून आले. असे असले तरी या काळात शेतीवर अनेक नैसर्गिक संकटे येऊन गेली. अवकाळी पाऊस, वादळ, अतिवृष्टी आणि आता गारपीट यामुळे शेतीचे प्रत्येक हंगामात मोठे नुकसान होत आले आहे. कोरोनाच्या संकटाकडे दुर्लक्ष करीत शेतकरी शेतात राबवत आहे. मात्र, दर हंगामात पीक काढणीला आले की असे संकट येत असल्याचा अनुभव येत असल्याने शेतकऱ्यांमध्ये निराशा पसरली आहे.योग्य वेळी आंब्याला मुबलक बहर आला मात्र अवकाळी गारपीट येऊन सारा सत्यानाश केल्याचे चित्र सगळीकडे दिसत आहे. भाजीपाला आणि फळबागातील उत्पन्न शेतकऱ्याचे येणारे वर्ष चालवत असते ,त्याच्या आधारावर कुटुंबातील आर्थिक भार त्याचा हलका होत असतो मात्र आता त्याचीही शास्वती राहिली नसल्याने हा पोशिंदा मोठ्या संकटात सापडला आहे. राजकीय नेते आणि पक्ष त्याचे गुणगान करून थकत नाहीत अन हातात काही देत नाहीत.

# बघ्यांची गर्दी

**आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांकडे आपण कोणत्या दृष्टिकोनातून बघतो, त्यावर कसे व्यक्त होतो, त्याला कसा प्रतिसाद देतो, यावर आपण नागरिक म्हणून समाजाबाबत किती जबाबदार आहोत, हे प्रतीत होते; परंतु माझ्यामुळे काय फरक पडणार आहे, असा विचार केल्यास समाज आणि व्यक्ती म्हणून आपल्यात बधिरता आली असल्याचे समजावे. परंतु माणूस म्हणून अजूनही सर्व संवेदना शाबूत आहेत असं वाटत असेल तर एक नागरिक म्हणून आवाज उठवत राहू या...!**

१६ एप्रिल हा 'जागतिक आवाज दिन' म्हणून साजरा केला जातो. व्यावसायिक कारणांसाठी आवाजाचा वापर करणाऱ्या गायक, अभिनेते, शिक्षक, वकील, राजकारणी अशा सगळ्यांसाठीच या दिवसाचं खूप महत्त्व आहे. या दिवसासाठी या वर्षी जागतिक संघटनेने जाहीर केलेले बोधवाक्य आहे 'युवर व्हॉइस मॅटर्स', अर्थात, 'तुमचा आवाज महत्त्वाचा आहे'. याच वाक्याचा दुसराही एक गर्भित अर्थ आहे जो विशेषतः सध्याच्या सामाजिक पार्श्वभूमीवर खूप प्रकर्षाने जाणवतोय.

शारीरिक विकारांमुळे कंठातून न निघणाऱ्या आवाजावर एकवेळ उपचार करता येतील, पण एखाद्या व्यक्तीने अथवा समाजाने गृहितच धरलं, की 'आपल्याला आवाजच नाही' तर मग त्या समाजाचं काय करायचं? पदोपदी एक नागरिक म्हणून अनेक गोष्टी जाणवत



राहतात, खटकतात; पण आपण त्याविषयी तोंडातून साधा 'ब्र'ही काढणं टाळतो. यात 'मी एकट्याने बोलून काय फरक पडणार आहे' असा विचार असतो किंवा 'मी बोललो तर मला त्याचे परिणाम भोगावे लागतील का' हे भयही असू शकतं; पण बोलायला तर हवंच, राष्ट्रीय चिन्ह असलेल्या अशोक स्तंभावरील एक सिंह हे 'धैर्याचं प्रतीक' आहे हे विसरून कसं चालेल?

उदाहरण म्हणून या साध्या गोष्टी घ्या. भररहदारीच्या रस्त्यांवर दर दोन दिवसांनी उभे राहणारे राजकीय नेत्यांच्या वाढदिवसांच्या शुभेच्छांचे फलक 'हे राज्याच्या अथवा देशाच्या हितोपयोगी कसे बरे' याची कोणी कारणमीमांसा करेल काय? अशा फलकांवरील वाढदिवस असलेल्या नेत्याचा चेहरा, त्याच्या डोक्याला चिकटून अजून दोनतीन राजकीय चेहरे, त्याखालची १५-२० स्थानिक (?) राजकीय मंडळींच्या फोटोंची पंगत, सोबतच कोण्या शुभेच्छुक ताई-मॅडम यांचे सालंकृत फोटो हे सर्व 'शहर सुशोभीकरण मोहिमे'चा एक भाग आहे, असे नागरिकांनी समजणं अपेक्षित आहे काय?

या फलकावर केला जाणारा खर्च प्रभागाच्या इतर विकासकामांवर किंवा एखाद्या गरजू विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गरजांवर किंवा गरजू रुग्णांच्या उपचारांसाठी करणं योग्य ठरणार नाही.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# एसटी कर्मचाऱ्यांच्या पदरी प्रतीक्षाच!

## वेतनाबाबत राज्य सरकारकडून फसवणूक सुरू असल्याचा आरोप

।अयोध्या।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पगार वाढ आणि इतर कारणांसाठी संपावर गेलेल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या (ST WORKERS) पदरी पगाराच्या ऐवजी प्रतिक्षा असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (MSRTC WORKERS) कर्मचारी आणि अधिकारी यांना दहा तारीख उलटली तरी वेतन (SALARY) मिळाले नाही. त्यामुळे एसटी कर्मचारी हतबल झाले असल्याचे दिसून येत आहे. सरकारने फक्त 165 कोटी रुपयांचा सवलत मूल्य रक्कमेच्या परताव्याचा निधी देणे, सदर निधी एसटीच्या खात्यावर जमा न होणे ही शुद्ध फसवणूक असून याला राज्य सरकारचा भोंगळ कारभार जबाबदार असल्याचा आरोप एसटी कर्मचाऱ्यांनी केला आहे.**

राज्य सरकार हे संप काळात दिलेल्या आश्वासनाकडे डोळेझाक करीत असून त्यामुळे कर्मचाऱ्याना वेळेवर वेतन मिळत नाही. हे आता नित्याचेच झाले असून ही कर्मचाऱ्यांची थट्टा सुरू आहे, असा आरोप महाराष्ट्र एस. टी. कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे.

एसटी महामंडळाला वेतनासाठी दर महिन्याला 360 कोटी रुपये इतक्या निधीची निधीची गरज आहे. मात्र, 165 कोटी इतकी कमी रक्कम महामंडळाला देणे आणि ती सुध्दा सवलत मूल्य रक्कमेतून देणे ही शुद्ध फसवणूक असल्याचे एसटी कर्मचारी काँग्रेसने म्हटले आहे. वेतनाला लागणारी पूर्ण रक्कम बजेट मध्ये तरतूद करून देण्याचे आश्वासन सरकारने संप काळात दिले होते. त्याकरिता स्वतंत्र वेगळा निधी देणे गरजेचे असताना त्याचा विसर सरकारला पडला आहे. काही दिवसांपूर्वी शासनाच्या



परिपत्रकात जाहीर केलेली, 165 कोटी रुपये ही रक्कम वेतनासाठी अपुरी असून ही रक्कम एसटीच्या खात्यावर अद्यापि वर्ग झालेली नाही. या मुळे कर्मचाऱ्यांना या महिन्यात सुद्धा वेतन वेळेवर मिळालेले नसून, निधी देण्याच्या बनवाबनवी मुळे या पुढे महामंडळ आर्थिक सक्षम होणार नाही. या पुढे कुठलीही विकासकाने होणार नाहीत. कदाचित डिझल अभावी गाड्या उभ्या राहतील अशीच परिस्थिती असल्याचे एस. टी. कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी म्हटले.

सरकारकडून 165 कोटी रुपये इतकी रक्कम एसटीच्या खात्यावर वर्ग झाली तरी या रकमेमध्ये नक्त वेतन (पीएफ, ग्रॅज्युएटी वगळून) सुद्धा देता येणार नाही असे बरगे यांनी म्हटले. नक्त वेतनासाठी 205 कोटी रुपये इतका निधी लागत आहे. संप काळात उच्च न्यायालयात सरकारने वेतनासाठी लागणारी पूर्ण रक्कम एसटी महामंडळाला दिली जाईल असे सांगितले होते. तसे शपथपत्र सरकारच्या वतीने त्रिसदस्यीय समितीने न्यायालयात दिले आहे. मात्र पूर्ण रक्कम देण्यात येत नाही. नवे सरकार आल्यापासून तर एकदाही पूर्ण रक्कम देण्यात आलेली नसून हे सरकार एसटी कर्मचाऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार करत असल्याचा आरोप, बरगे यांनी केला आहे. शिंदे-फडणवीस सरकार हे इतिहासातील सर्वात फसवे सरकार असून एसटीला व कर्मचाऱ्यांना मदत करण्याच्या फक्त गप्पा मारल्या जातात. प्रत्यक्षात मात्र तोंडाला पाने पुसली जात आहेत असा आरोपही बरगे यांनी केला आहे.

### विरोधक हे विरोध करायचा म्हणून बोलतात

**एसटी महामंडळाला वेतनासाठी दर महिन्याला 360 कोटी रुपये इतक्या निधीची निधीची गरज आहे. मात्र, 165 कोटी इतकी कमी रक्कम महामंडळाला देणे आणि ती सुध्दा सवलत मूल्य रक्कमेतून देणे ही शुद्ध फसवणूक असल्याचे एसटी कर्मचारी काँग्रेसने म्हटले आहे. वेतनाला लागणारी पूर्ण रक्कम बजेट मध्ये तरतूद करून देण्याचे आश्वासन सरकारने संप काळात दिले होते. त्याकरिता स्वतंत्र वेगळा निधी देणे गरजेचे असताना त्याचा विसर सरकारला पडला आहे. काही दिवसांपूर्वी शासनाच्या परिपत्रकात जाहीर केलेली, 165 कोटी रुपये ही रक्कम वेतनासाठी अपुरी असून ही रक्कम एसटीच्या खात्यावर अद्यापि वर्ग झालेली नाही. या मुळे कर्मचाऱ्यांना या महिन्यात सुद्धा वेतन वेळेवर मिळालेले नसून, निधी देण्याच्या बनवाबनवी मुळे या पुढे महामंडळ आर्थिक सक्षम होणार नाही**

# राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का

।मुंबई।।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्रीय निवडणूक आयोगानं राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. निवडणूक आयोगानं राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रीय पक्षाचा दर्जा रद्द केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील प्रमुख पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला हा मोठा धक्का मानला जात आहे.

विशेष म्हणजे केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादीसह 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' आणि 'तृणमूल काँग्रेस' या अन्य दोन पक्षांचाही राष्ट्रीय पक्षाचा दर्जा काढून घेतला आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा राष्ट्रीय पक्षाचा दर्जा काढून घेतल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुनील तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली."निवडणूक आयोगानं जो काही निर्णय घेतला आहे, त्याची अधिकृत माहिती आम्हाला अद्याप प्राप्त झाली नाही, त्यांच्या निर्णयाची प्रत आम्हाला मिळाल्यानंतर निश्चित यावर कायदेशीर विचार करावा लागेल.



# अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून अहवाल सादर करा

## नाशिकमध्ये एकनाथ शिंदेंनी पिकांची पाहणी केली

। नाशिक ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

नाशिकमधील बागलाण तालुक्यातील बिजोटे, आखतवाडे, निताणे गावांत अवकाळी पाऊस, वादळी वारा आणि गारपीटीमुळे बाधित झालेल्या पिकांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. तसेच, नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन अहवाल तात्काळ शासनास सादर करण्याच्या सूचना संबधित अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

"शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून मंत्रीमंडळात मदतीबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल," अशी ग्वाही मुख्यमंत्री शिंदेंनी दिली.



बागलाण तालुक्यातील मोसम व करंजाडी खोऱ्यातील करंजाड, भुयाने, निताणे, आखतवाडे, बिजोटे, गोराणे, आनंदपूर, द्याने, उतराणे, तर सटाणा, शेमळी, अजमीर सौंदाणे, चौगाव, कर्हे, ब्राह्मणगाव, लखमापुर, आराई, धांद्री आदी गावांत शनिवारी ( ८ एप्रिल ) अवकाळी पाऊस, वादळी वारा, विजांचा कडकडाट व गारपिटीने थैमान घातले. यामुळे उन्हाळी कांदा, गहू, हरभरा, आंबा, भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बिजोटे, आखतवाडे, निताणे आदी गावांतील नुकसानीची पाहणी केली. यावेळी पालकमंत्री दादाजी भुसे, बागलाणचे आमदार दिलीप बोरसे, जिल्हाधिकारी गंगाथरन् डी., मालेगावच्या अपर जिल्हाधिकारी माया पाटोळे, बागलाण प्रांत बबन काकडे, तहसिलदार जितेंद्र इंगळे, गट विकास अधिकारी पी.एस. कोल्हे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक सोनवणे, निताणेचे सरपंच अशोक देवरे उपस्थित होते."नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी संबंधित तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायकांच्या सहाय्याने आपापल्या शेतशिवारातील नुकसानाचे पंचनामे करून जबाबदारीने नोंद करून घ्यावी," असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी निताणे, आखतवाडे, बिजोटे येथील कांदा, डांळीब, पपई व इतर पिकांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी केली.

# गृहमंत्र्यांच्या दौऱ्यावर चीनचा आक्षेप!

## चीनचा आक्षेप,अमित शाहांचं सडेतोड उत्तर

**।कर्नाटक महाईन्यूज।**



भारताचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अरुणाचल प्रदेशचा दौरा केल्यानंतर चीनने या भेटीवर आक्षेप घेतला. अमित शाहांच्या या दौऱ्यामुळे चीनच्या प्रादेशिक सार्वभौमत्वाचं उल्लंघन झाल्याचा दावा चीनने केला. यानंतर अमित शाह यांनी अरुणाचल प्रदेशमध्ये भारत-चीन सीमेवरील गावात जाऊन चीनला प्रत्युत्तर दिलं. ते सोमवारी (१० एप्रिल) किबिथू गावात 'व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम' कार्यक्रमात बोलत होते.

अमित शाह म्हणाले, "कुणीही भारताच्या सीमेकडे डोळे वर करून पाहू शकणार नाही. भारताच्या भूमीवर अतिक्रमण करण्याचा काळ गेला. आता सुईच्या टोकाएवढ्या जमिनीवरही अतिक्रमण कुणी करू शकत नाही. कारण आयटीबीपी आणि भारतीय सैन्य इथं उपस्थित आहे. आपल्या कुटुंबापासून दूर इथं आपलं तारुण्य घालवणाऱ्या सर्व सैनिकांच्या त्याग, बलिदान, शौर्य आणि देशभक्तीला मी प्रणाम करतो. चीनने रविवारी (९ एप्रिल) अरुणाचल प्रदेशमधील ११ ठिकाणांची नावं बदलली. तसेच ही सर्व ठिकाणं चीनची असल्याचाही दावा केला. हे सर्व ठिकाण तिबेटच्या दक्षिण क्षेत्राचा भाग असल्याचा चीनचा दावा आहे.

चीनने दोन भूभाग, दोन रहिवासी भाग, पाच शिखरं आणि दोन नद्यांचा समावेश असलेली यादी जाहीर केली आहे. ही चीनने जाहीर केलेली तिसरी यादी आहे. याआधी २०१७ मध्ये चीनने अरुणाचल प्रदेशमधील ६ भागांचा समावेश असलेली पहिली यादी जाहीर केली होती. २०२१ मध्ये १५ ठिकाणांचा समावेश असलेली दुसरी यादी जाहीर करण्यात आली होती आणि आता तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे.

### अरुणाचल प्रदेशचे लोक भेटल्यावर नमस्कार बोलत नाहीत, तर..."

**"अरुणाचल प्रदेशचे लोक भेटल्यावर नमस्कार बोलत नाहीत, तर जयहिंद बोलतात. याच भावनेने अरुणाचल प्रदेशला भारताशी जोडलं आहे. १९६२ मध्ये जे भारतावर अतिक्रमण करण्यासाठी आले होते त्यांना अरुणाचल प्रदेशच्या नागरिकांच्या देशभक्तीने माघारी जावं लागलं होतं. देश अरुणाचल प्रदेशच्या नागरिकांच्या या देशभक्तीला सलाम करतो. मीही त्यांच्या देशभक्तीला सलाम करतो," असं मत अमित शाह यांनी व्यक्त केलं.**

### चीनने नेमका काय आक्षेप घेतला?

चीनच्या परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते वांग वेंबिन म्हणाले, "अमित शाह यांच्या अरुणाचल आणि आसामच्या दौऱ्यात चीनच्या प्रादेशिक सार्वभौमत्वाचे उल्लंघन झाले आहे. हे सीमावर्ती भागातील शांततेसाठी चांगले नाही."

## व्यथा काश्मीरच्या: तब्बल ७५ वर्षे वीज नाही, डॉक्टर नाही

### बाळंतपण केवळ सुईणीवरच अवलंबून!

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



**जम्मू आणि काश्मीरमधील वझिरिथल भागातील महिलांना बहुतेकवेळा अपत्याला अंधारातच जन्म द्यावा लागतो, असं सांगितलं तर त्यावर विश्वास बसेल? नक्कीच नाही! पण हेच भीषण वास्तव आहे आपल्याच देशातलं. अनियमित वीज पुरवठा आणि सार्वजनिक आरोग्य सुविधांचा अभाव, वैद्यकीय रिक्त पदे भरण्यातील गलथानपणा यामुळे जम्मू आणि काश्मीरमधील बांदिपोर जिल्ह्यातल्या दुर्गम खेड्यातील गरोदर महिलांना प्रसुतीसाठी संघर्ष करावा लागतो. खोऱ्यातल्या दुर्गम गावांत वीज नाही,**

प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा नाही, अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये या गावातल्या गरोदर स्त्रियांची सगळी भिस्त एकविसाव्या शतकातही दुर्दैवाने तिथल्या वयस्कर अनुभवी सुईणीवर एकवटलेली आहे!जम्मू आणि काश्मीरमधल्या बांदिपूर जिल्ह्यातल्या वझिरीथलसारख्या गावांमध्ये एकतर सूर्य फार काळ किंवा रोज दिसत नाही. त्यामुळे पूर्वी इथले गावकरी रॉकेलच्या कंदिलावर आणि आताशा सौर उर्जेवर अवलंबून असतात. याच गावातील २२ वर्षांची शमिना बेगम दुसऱ्या खेपेच्या प्रसूतीबद्दलचा अनुभव सांगते. ती म्हणते, तीन दिवस सतत इथे बर्फवृष्टी होत होती.

बर्फवृष्टी होत असताना या भागांत कित्येक दिवस सूर्यप्रकाश जवळपास नसतोच, साहजिकच घराचा सौर संच चार्जही होऊ शकत नाही. यातच एकेदिवशी संध्याकाळी माझी गर्भपिशवी फुटली. प्रसुतीपूर्व जीवघेण्या वेदनांनी मी कण्हत होते. माझं दुसरं अपत्य जन्माला येणार होतं. घरात सगळीकडे अंधार पसरलेला होता. एकच काय तो रॉकेलवर जळणारा कंदिल तेवत होता. माझं कण्हणं ऐकून आमच्या शेजारणी त्यांच्या त्यांच्या घरचे कंदिल घेऊन आल्या. त्या पाच कंदिलांच्या प्रकाशाने खोली भरून गेली. एप्रिल, २०२२ च्या त्या रात्री कंदिलांच्या उजेडात आईच्यासाथीने मी रशिदाला जन्म दिला. आई त्यावेळी मदतीला नसती तर गर्भपिशवी फुटल्याने दुसऱ्या बाळंतपणात मी वाचू शकले नसते, हेही तितकंच खरं आहे.

शमिनाच्या घरापासून पाच – सहा घरे सोडून राहणाऱ्या आफरिनची गोष्ट वेगळीच आहे. २०१६ साली गुरेझमधील केंद्रिय आरोग्य केंद्रामध्ये नवऱ्याने अक्षरशः पाठीवरून प्रसुतीसाठी नेल्याचं ती सांगते. त्या केंद्रावर नेण्यासाठी तिच्या नवऱ्याने सुमो गाडी ठरवली होती. त्या गाडीपर्यंत पोहोचण्यासाठी ३०० मीटर अंतर नवऱ्याच्या पाठुंगळी बसून जाण्याशिवाय आफरिनकडे अन्य पर्यायच नव्हता. ह्या घटनेला आता आठ वर्ष उलटून गेली असली तरीही काश्मीर खोऱ्यातल्या गावांची स्थिती अद्यापही तशीच आहे. आतातर आमची सुईणही म्हातारी होत चालली आहे, कधीमधी आजारीही पडते. ही सुईण म्हणजे शमिनाची आई आहे, असंही ती सांगते.

वझिरीथल गावात वीजेच्या समस्येबरोबर मुलभूत आरोग्य सुविधांचाही अभावच आहे. गावापासून ५ किमी अंतरावर एक प्राथमिक आरोग्य केंद्र आहे परंतु केंद्रात वैद्यकीय कर्मचाऱ्यांची पदं रिक्त असल्याने नैसर्गिक – सामान्य प्रसुती हाताळण्याइतकीसुद्धा ही केंद्रे सुसज्ज नाहीत. बादुगम इथल्या केंद्रावर तर केवळ एकच नर्स आहे.

## फडणवीसांच्या निकटवर्तीयाकडे कर्नाटकात खास जबाबदारी

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

भाजपने कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देशातील ५४ नेत्यांची स्टार प्रचारक म्हणून नियुक्ती केली आहे. या यादीमध्ये महाराष्ट्रातील सहा नेत्यांचा समावेश आहे. कर्नाटकातील अनेकल विधानसभा मतदारसंघ हा काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. तर या मतदारसंघाचे प्रभारी म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे निकटवर्तीय प्रा. राम शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तर राम शिंदे हे नुकतेच अयोध्या दौऱ्यावरून परतले

### अयोध्या दौऱ्यानंतर मोहिमेवर रवाना

त्यानंतर आता ते कर्नाटकातील मोहिमेसाठी रवाना झाले आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने जोर लावायला सुरवात केली आहे. त्यासाठी तेथील अवघड वाटणाऱ्या ५४ मतदारसंघासाठी वेगवेगळ्या नेत्याची नियुक्ती करण्यात आली आहे.

देशभरातील ५४ नेत्यांकडे मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. महाराष्ट्रातून केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार राम शिंदे, जयकुमार रावल, योगेश सागर, प्रसाद लाड यांचाही यामध्ये समावेश आहे.



# वरुण धवन व नताशा दलाल लवकरच होणार आई-बाबा?

बॉलीवूड अभिनेता वरुण धवन हा लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. वरुणने त्याची गर्लफ्रेंड नताशा दलालशी जानेवारी २०२१ मध्ये लग्न केले. आज वरुण आणि नताशा बॉलीवूडमधील लोकप्रिय जोडप्यांपैकी एक आहे. ते अनेकदा त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत असतात. तर आता वरुण आणि नताशा लवकरच आई-बाबा होणार अशा चर्चा रंगल्या.

वरुण आणि नताशा नेहमीच त्यांचं वैयक्तिक आयुष्य मीडियापासून दूर ठेवतात. तर वरुणची पत्नी नताशा फार क्वचित मीडियासमोर येते. पण आता त्यांचे काही शेअर आणि व्हिडीओ व्हायरल होत आहेत. हे फोटो पाहून ते लवकरच आई-बाबा होणार असा अंदाज नेटकरी लावत आहेत. पण आता यावर वरुण-नताशाच्या जवळच्या व्यक्तीने प्रतिक्रिया देत खरं काय ते सांगितलं आहे.वरुण आणि नताशाचा एक व्हिडीओ सध्या चर्चेत आला. या व्हिडिओमध्ये ते मुंबईतील एका फर्टिलिटी क्लिनिकमधून बाहेर पडताना दिसून येत आहेत. त्यामुळे नताशा आई बनणार आहे का? असा प्रश्न त्यांच्या चाहत्यांच्या मनात उपस्थित झाला आहे. हा व्हिडीओ व्हायरल होताच यावर त्यांच्या चाहत्यांनी विविध प्रतिक्रिया देत ती दोघं आई-बाबा होणार असल्याचा अंदाज बांधायला सुरुवात केली. पण ती दोघं फर्टिलिटी क्लिनिकमध्ये नाही तर डर्मेटोलॉजिस्टकडे गेले होते. ती दोघं आई-बाबा होणार ही गोष्ट खोटी असून या सर्व अफवा आहेत, वरुण आणि नताशा आई-बाबा होणार असल्याच्या चर्चा रंगण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी देखील दोन वेळा नताशा गुड न्यूज देणार अशा चर्चा रंगल्या होत्या. तर एकदा नताशाने स्पष्टपणे या सर्व अफवा असल्याचंही सांगितलं होतं.



# कंगनालाही तिच्या स्वप्नाचा राजकुमार भेटलाच?



बॉलिवूड अभिनेत्री कंगना रणौत हे बॉलिवूडमधील असं नाव आहे जे नेहमीच चर्चेत असतं. कंगणा आणि करण जोहरमध्ये सध्या सोशल मिडियावर शित यूद्ध पहायला मिळत आहे.कंगनानं आधी करण जोहरला डिवचल त्याच कारण ठरली प्रियंका मात्र करण जोहरनेही तिला चांगलच प्रतिउत्तर दिल आता पुन्हा कंगनानं करण जोहरला चाचा चौधरी म्हणतं सुनावल.कंगना नेहमीच तिच्या वक्तव्यामुळे आणि चित्रपटामुळे जितकी चर्चेत असते तितकीच ती तिच्या वैयक्तिक आयूष्यामुळेही चर्चेत कारण ठरते.आजही तिच्या भूतकाळातील अफेअर्सच्या बऱ्याच चर्चा रंगतात. तिने लवकरच सेटल व्हावे अशी चाहत्यांची इच्छा आहे. आता कंगना तिच्या चाहत्यांची ही इच्छा लवकरच पूर्ण करणार असल्याचे दिसते आहे.तिने तिचे काही फोटो शेअर केले आहेत, जे पाहून प्रत्येकजण आश्चर्यचकित झाला आहे. कंगना कोणाच्या प्रेमात पडली आहे असा प्रश्नही ते विचारत आहे.कंगनाचे हे फोटो सध्या सोशल मिडियावर व्हायरल झाले आहेत.कंगनाने तिचे काही फोटो सोशल मिडियावर शेअर करत लिहिलयं की, 'इश्क वो आतिश है गालिब जो लगने से लगती नहीं और बुझाने से बुझती नहीं'36 वर्षीय कंगनाची ही पोस्ट पाहिल्यानंतर चाहते तिच्या लूकचे कौतुक करत आहेत. एकाने लिहिलंय, 'कोण आहे जो स्वप्नात आला आहे, तो कोण आहे जो हृदयात शिरला तर काहींनी तर काहींनी तिच्या सौंदर्याचं कौतुक केलयं मात्र त्यावेळी काहींनी पुन्हा तिला ऋतिक रोशनची आठवण येत आहे का असं म्हणत टोमणेही मारले आहेत.2021 मध्ये दिलेल्या मुलाखतीत कंगना रणौत म्हणाली होती, ' तिला लग्न

# मंदिरात दर्शनासाठी गेलेली नयनतारा पब्लिकनं घेरल्यावर भडकली..



शाहरुख खानच्या जलवान सिनेमाची अभिनेत्री आणि लेडी सुपरस्टार म्हणून ओळखली जाणारी नयनतारा काही दिवसांपूर्वीच आपला पती विघ्नेश शिवनसोबत मंदिरात पोहोचली होती,त्यावेळचे अनेक फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसले. पंगुनी उथीराम(दक्षिण भारतातील एक सण) च्या शुभ प्रसंगी हे कपल मंदिरात दर्शनासाठी पोहचलं, ज्यानंतर एका वादाचा जन्म झाला.

नयनतारा मंदिरात दर्शनासाठी गेली असताना काहीशी रागात दिसली,ज्याचा एक व्हिडीओ समोर आला आहे, या व्हिडीओत आपण पाहू शकता की एका चाहत्यानं आपल्या कॅमेऱ्यानं अभिनेत्रीला शूट करण्याचा प्रयत्न केला,ज्यामुळे नयनाताराच्या रागावरचं नियंत्रण सुटलंव्हिडीओत आपण पाहू शकता की चाहत्यानं नयनताराला पाठमोरं शूट करण्याचा प्रयत्न केला,ज्यामुळे अभिनेत्री काहीशी त्रस्त दिसली. माहितीसाठी इथं सांगतो की,नयनतारा आपला पती विघ्नेश शिवनसोबत कुंभकोणम जवळील कामाक्षी अम्मन मंदिरात दर्शन करण्यासाठी गेली होती.

# जेव्हा दोन 'विद्या' एकमेकांना भेटतात.. मुक्ताची वंदनाताईसाठी खास पोस्ट

झी नाट्यगौरव पुरस्कार म्हटलं कि सर्वांना उत्सुकता असते विविध नाट्यप्रवेश पाहायची. टीव्हीवर घरबसल्या प्रेक्षकांना गाजलेल्या नाटकांचे प्रवेश पाहता येतात.

आजवर झी नाट्य गौरव मध्ये अशी पाखरे येती, वाडा चिरेबंदी, सही रे सही अशा अनेक गाजलेल्या नाटकांचे छोटे प्रवेश बघता आले.यंदाही 'झी नाट्य गौरव पुरस्कार सोहळा २०२३' अत्यंत खास झाला. या नाट्य गौरव पुरस्कार सोहळयात मुक्ता बर्वेने सादर केलेला चारचौघीचा नाट्यप्रवेश विशेष गाजला.

प्रशांत दळवी लिखित आणि चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित चारचौघी हे नाटक पुनरुज्जीवित होऊन रंगभूमीवर गाजत आहे.या नाटकात मुक्ता बर्वे, रोहिणी हट्टंगडी, कादंबरी कदम आणि पर्ण पेठे या अभिनेत्री प्रमुख भूमिका साकारत आहे.

या नाटकाचे मराठी रंगभूमीवर १९९१ ला पहिल्यांदा प्रयोग सादर झाले. या मूळ संचात वंदना गुप्ते, दीपा श्रीराम, आसावरी जोशी आणि प्रतीक्षा लोणकर या चौघींनी भूमिका साकारल्या होत्या. पुनरुज्जीवित नाटकात मुक्ता बर्वे वंदना गुप्तेंची भूमिका साकारत आहे. यंदाच्या झी नाट्य गौरव पुरस्कार सोहळ्यात वंदना गुप्ते यांच्या समोरच मुक्ताने चारचौघी नाटकातला गाजलेल्या फोन कॉलचा प्रवेश सादर केला. मुक्ताने वंदना गुप्ते यांच्यासोबतचा फोटो पोस्ट करून भावना व्यक्त केल्या आहेत.

मुक्ता लिहिते.. डबलसीट मधे सासू-सून म्हणुन एकत्र होतो, रूद्रम मधे आई- मुलगी म्हणुन आणि आता चारचौघी मधे तर तू साकारलेली विद्या साकारते म्हणुन. निमित्त कोणतंही चालेल एकत्र काम आणि मजा करतच राहू. वंदूताई तुला खूप खूप प्रेम..

जशी आहेस तशीच मस्त,बिनधास्त,दिलखुलास रहा. तुझ्या ENERGY नी आम्हाला INSPIRATION देत रहा.. झी नाट्य गौरव चे विशेष आभार या दोन 'विद्या' एकमेकांना भेटवल्या बद्दल..



# लखनऊने बंगळुरुविरुद्ध 1 विकेटने नोंदवला ऐतिहासिक विजय!

## पूरण-स्टोइनिसने पाडला धावांचा पाऊस

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

:आयपीएलमध्ये आज लखनऊ सुपर जायंट्सचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी झाला. या रोमांचक सामन्यात शेवटच्या चेंडूवर लखनऊने १ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आरसीबी संघाने २ बाद २१२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात एलएसजी संघाने पूरण-स्टोइनिसच्या वादळी खेळीच्या जोरावर ९ गडी गमावून विजय मिळवला.आरसीबीसाठी विराट कोहली, फाफ डुप्लेसिस आणि ग्लेन मॅक्सवेल यांनी अर्धशतकी खेळी खेळली. तर सिराज आणि पारनेल यांनी ३-३ विकेट घेतल्या.

स्टॉइनिस आणि पूरनने लखनऊला दणदणीत विजय मिळवून दिला –

२१३ धावांचा पाठलाग करताना लखनऊ सुपर जायंट्सची सुरुवातीला खराब फलंदाजी पाहायला मिळाली. संघाने पहिल्याच षटकात १ धावांवर काइल मेयर्सच्या (०) रूपाने पहिली विकेट गमावली. यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला दीपक हुडाही फार काळ टिकू शकला नाही आणि १० चेंडूत ९ धावा काढून तो वेन पारनेलचा बळी ठरला. चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या मार्कस स्टॉइनिसने काही काळ जबाबदारी सांभाळली आणि ३० चेंडूत ६ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ६५ धावांची धडाकेबाज खेळी केली आणि संघाला मजबूत स्थितीत आणले.



पुरणने केवळ १९ चेंडूत ४ चौकार आणि ७ षटकारांच्या मदतीने ६३ धावांची धडाकेबाज खेळी केली. यादरम्यान त्याचा स्ट्राइक रेट ३२६.३२ होता. पूरन आणि आयुष बडोनी यांनी मिळून सहाव्या विकेटसाठी ८४ धावांची भागीदारी केली. सिराजने पुरणचा डाव संपुष्टात आणला.

यानंतर १९व्या षटकात चांगली फलंदाजी करणाऱ्या आयुष बडोनीने आपली विकेट गमावली. बडोनी २४ चेंडूत ३० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला.

यानंतर मार्क वुड (१) आणि जयदेव उनाडकट (९) यांनी विकेट गमावल्या. लखनऊला शेवटच्या चेंडूवर एका धावाची गरज होती आणि ती लेगबायद्वारे मिळाली.

या सामन्यात आरसीबीकडून मिश्र गोलंदाजी पाहायला मिळाली. काही गोलंदाजांनी कमी धावा केल्या, तर काही गोलंदाज अधिक महागडे. मोहम्मद सिराज हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने ४ षटकात २२ धावा देत ३ बळी घेतले. याशिवाय वेन पारनेलने 4 षटकांत ४१ धावा देत ३ बळी घेतले. दुसरीकडे कर्ण शर्माने ३ षटकांत ४८ धावा देत २ बळी घेतले. उर्वरित गोलंदाजांमध्ये हर्षल पटेलने ४ षटकांत ४८ धावा देत १ बळी घेतला.

### चौथ्या विकेटसाठी 40 चेंडूत 76 धावांची भागीदारी

» कर्णधार केएल राहुल आणि मार्क स्टॉइनिस यांनी चौथ्या विकेटसाठी ४० चेंडूत ७६ धावांची भागीदारी केली. दोघेही क्रीझवर जास्त वेळ घालवू शकले नाहीत. ११व्या षटकात कर्ण शर्माने स्टोइनिसला तर १२व्या षटकात मोहम्मद सिराजने केएल राहुलला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. राहुल २० चेंडूत केवळ १८ धावा करून बाद झाला. सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या विकेटकीपर फलंदाज निकोलस पूरनने संघाला विजयाची आशा निर्माण करून दिली.

# बीसीसीआयची अधिकाऱ्यांसाठी मोठी घोषणा; दैनिक भत्ता मिळणार!

## » बिझनेस क्लास प्रवासा सोबत सुविधाही मिळणार

। गुवाहाटी ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) अधिकाऱ्यांना आता परदेश दौऱ्यांवर एक हजार डॉलर्सचा दैनिक भत्ता मिळणार आहे. त्याचबरोबर त्यांना प्रथम श्रेणीत प्रवास करण्याचा अधिकार असेल. बीसीसीआयच्या पदाधिकाऱ्यांचे भत्ते वाढवण्याचा प्रस्ताव रविवारी सर्वोच्च परिषदेच्या बैठकीत मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. परंतु तो गेल्या वर्षी ऑक्टोबरपासून लागू झाला आहे. सात वर्षांहून अधिक काळानंतर दैनिक भत्ते वाढले आहेत.

याआधी जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट बोर्डाच्या अधिकाऱ्यांना परदेश दौऱ्यावर दररोज ७५० डॉलर मिळत होते. बीसीसीआयच्या




दस्तऐवजानुसार, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार आणि संयुक्त सचिवांसह पदाधिकाऱ्यांना भारतात मीटिंगसाठी आणि बिझनेस क्लासमध्ये प्रवासाची सुविधा यासाठी दररोज ४०,००० रुपये मिळतील. कामाच्या संदर्भात प्रवास करण्यासाठी त्यांना दररोज ३०,००० रुपये भत्ता दिला जाईल. देशांतर्गत आणि परदेश दौऱ्यावर त्यांच्यासाठी 'सूइट' रूम बुक केली जाईल. आयपीएल अध्यक्षांचे भत्तेही पदाधिकाऱ्यांच्या श्रेणीत समाविष्ट केले आहेत. क्रिकेट असोसिएशन ऑफ इंडियाच्या दोन प्रतिनिधींसह बीसीसीआय सर्वोच्च परिषदेच्या सदस्यांना त्यांच्या प्रत्येक त्रैमासिक बैठकीसाठी ४०,००० रुपये प्रतिदिन मिळतील. परदेश दौऱ्यावर त्यांना ५०० डॉलर्स दिले जाणार आहेत. तथापि, सामान्यतः अधिकारी कामानिमित्त परदेश दौऱ्यावर जातात.

मंडळाने त्यांच्या राज्य संघटनांच्या सदस्यांच्या भत्त्यांमध्येही सुधारणा केली आहे. त्यांना आता देशांतर्गत प्रवासासाठी दररोज ३०,००० रुपये आणि परदेशी प्रवासासाठी दररोज ४०० डॉलर्स मिळतील. पुरुष आणि महिला राष्ट्रीय क्रिकेट संघांसाठी मुख्य प्रशिक्षकाची निवड करणाऱ्या क्रिकेट सल्लागार समितीच्या तीन सदस्यांना प्रत्येक बैठकीसाठी ३.५ लाख रुपये दिले जातील. त्यांच्या बाबतीत, परदेशात प्रवास करण्याची शक्यता नाही, परंतु जर त्याने असे केले तर त्याला दररोज ४०० डॉलर्स दिले जातील. बीसीसीआयच्या पदाधिकाऱ्याचे पद हे मानाचे असते. सीईओ सारख्या बीसीसीआयच्या पगारदार कर्मचाऱ्याला परदेश दौऱ्यांवर दररोज ६५० डॉलर्स आणि भारतात १५,००० रुपये मिळतात.

# सलग ५ षटकार खाणाऱ्या यश दयालने नोंदवला लाजिरवाणा विक्रम

## 'हा' कारनामा करणारा ठरला दुसरा गोलंदाज

। कोलकाता । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएल २०२३ मध्ये, रविवारी कोलकाता नाइट रायडर्स विरुद्ध गुजरात टायटन्स यांच्यातील सामना रंजक होता, ज्यामध्ये केकेआरने रिंकू सिंगच्या दमदार खेळीच्या जोरावर ३ गडी राखून विजय मिळवला. या सामन्याच्या शेवटच्या षटकात रिंकू सिंगने यश दयालविरुद्ध सलग ५ षटकार ठोकून सामन्याची दिशा बदलून टाकली. दरम्यान या सामन्यात यश दयालच्या नावावर एक नकोसा विक्रम नोंदवला गेला आहे.

कोलकाताला शेवटच्या षटकात गुजरात टायटन्सविरुद्ध विजयासाठी २९ धावा करायच्या होत्या. उमेश यादवने पहिल्या चेंडूवर एकेरी घेतली.अशा स्थितीत दुसऱ्या चेंडूवर स्ट्राइकवर पोहोचलेल्या रिंकूने धुमाकूळ घातला. त्याने २०व्या षटकांत यश दयालच्या शेवटच्या पाच चेंडूंवर पाच षटकार ठोकत आपल्या संघाला संस्मरणीय विजय मिळवून दिला. त्यामुळे एका षटकात ३१ धावा देत यश दयालने आयपीएलमध्ये एक लाजिरवाणा विक्रम नोंदवला आहे.

### यश दयालने इशांत शर्माला मागे टाकले

» रिंकू सिंगने शेवटच्या षटकात सलग पाच षटकार मारले. त्यामुळे यश दयालने एका षटकात सर्वाधिक धावा देण्याच्या बाबतीत इशांत शर्माला मागे टाकले आहे. यासह, तो आयपीएलच्या एका डावात सर्वाधिक धावा देणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानावर आला आहे. जिथे इशांत शर्माने एका डावात (४ षटकात) ६६ धावा दिल्या होत्या, तिथे आता यश दयालने ४ षटकात ६९ धावा देत इशांतचा विक्रम मोडला आहे.